(इंग्रजीमध्ये  टंकलिखित न्यायनिर्णयाचे मराठीत भाषांतर)

दिवाणी अपिलीय अधिकारिता

दिवाणी अपिल क्र. २२७४-२२७८/१९७७

वडक्केंचरी को-ऑपरेटिव्ह सर्व्हिस बँक लि. इत्यादी इत्यादी

विरुद्ध

केरळ राज्य आणि इतर.

फेब्रुवारी ७, १९९६

[के. रामास्वामी आणि बी. एल. हंसारिया, न्यायमूर्ती]

अपील — अशीच अपीले आधी नाकारण्यात आलेली — सध्या दाखल केलेली अपीले मागे घेण्याची मुभा देण्यात येते — अपीले मागे घेण्यात आल्यामुळे फेटाळली जातात.

दिवाणी अपिलीय अधिकार क्षेत्र : दिवाणी अपील क्रमांक २२७४ - ७८ /१९७७ इत्यादी

केरळ उच्च न्यायालयाच्या ओ. पी. क्रमांक ३११६, ३१२१, ३२३९, ३२४० आणि ३३७२ / १९७४ मधील दिनांक ३०.१२.७६ रोजीच्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

याचिकाकर्त्यांसाठी — व्ही. बी. सहाराया.

उत्तरवादींसाठी — एम. टी. जॉर्ज.

न्यायालयाने खालील आदेश पारित केला :

सी. ए. क्र. २२७४-७८/७७

विव्दान वकील असे सादर करतात की, दिनांक ६ डिसेंबर १९८२ रोजी एस. ए. क्र. २२७९/१९७७ आणि बॅचमध्ये या न्यायालयाने दिलेल्या अशाच प्रकारच्या आदेशानंतर आणि दिनांक १२ फेब्रुवारी १९९२ रोजी सी. ए. क्रमांक २९५/१९७८ मध्ये पारित आणखी एका आदेशानंतर अपील मागे घेण्याची परवानगी ते मागतात त्यानुसार अपील मागे घेतल्याने फेटाळले जाते. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

सी. ए. क्र. ३४३६-४७/१९९६[ @ एस. एल. पी. (सी) क्रमांक १०६-१७/७८]

अनुमती देण्यात येते.

अपीले मागे घेतल्याने फेटाळली जातात. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

जी. एन. अपीले मागे घेतली म्हणून फेटाळण्यात येतात.

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**********